**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज**

द्वितीय अपिल क्र.रामाआ / ३१७० / २०२४ / पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| देशमुख मोईन अब्दुल लतीफ | उपकार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग, पुणे | कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग, पुणे |

**( सुनावणी दिनांक - ३१ / १० /२०२५ )**

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये दि.०८.०५.२०२३ रोजी दाखल केलेले सदर द्वितीय अपील राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक यांचेकडून दि.२७.०५.२०२४ रोजी पुणे खंडपीठास हस्तांतरणाद्वारे प्राप्त झाले. व्दितीय अपील दाखल करतांना प्रयोजनामध्ये " माहिती दिली नाही " असे कारण नमूद केले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसूची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. त्यानूसार आज रोजी सुनावणीसाठी विद्यमान व तत्कालीन जन माहिती अधिकारी हजर आहेत. अपिलार्थी गैरहजर आहेत.

प्रस्तुत प्रकरणी, अपीलार्थी यांनी माहिती अर्जात जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशील |
|---|---|
| १२.११.२०२२ | आपल्या कार्यालयात किती व कोणते उपविभाग आहेत त्याची सविस्तर माहिती. |

आज रोजी सुनावणी दरम्यान जनमाहिती अधिकारी यांनी अवगत केले की, " अपिलार्थी यांचा माहिती अर्ज कार्यालयास अप्राप्त आहे. तथापि प्रथम अपील अर्जानंतर दि. २७.०२.२०२३ रोजीच्या पत्राने अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती हि माहिती अधिकार अधिनियम कलम ४ (ख) नुसार क्र. १ ते १७ मुद्द्यांची माहिती विभागीय कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर लावण्यात आलेली आहे, असे कळविले आहे.

तसेच अपिलार्थी यांच्या अर्जाचा सहानुभूती पूर्वक विचार करून माहिती अधिकारात मागितलेली माहिती सोबत पाठविण्यात आली आहे."

उपलब्ध अभिलेखावरून दिसून येते की, अपिलार्थी यांचा माहिती अर्ज सदर कार्यालयास अप्राप्त आहे. प्रथम अपील अर्जानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती पुरविली आहे. अपिलार्थी सुनावणीस गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांचे म्हणणे एकूण घेता आले नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

प्रस्तुत द्वितीय अपील कोणत्याही निर्देशाविना फेटाळण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

जावक क्र. ३१७० / २०२४ / पुणे 1018 / 2025 दिनांक - 20/11/25